# मुख्यमंत्री समृद्ध पंचायतराज अभियान

**ग्रामपंचायत विल्होळी ता. जि. नाशिक**

आज दिनांक १३/ ११/२०२५ गुरुवार रोजी सायंकाळी ८:०० वा.नाशिक तालुक्याच्या कर्तव्यदक्ष गटविकास अधिकारी मा.डॉ. सोनिया नाकाडे मॅडम, स.गटविकास अधिकारी श्री. सूर्यवंशी साहेब, विस्तार अधिकारी (ग्रामपंचायत) श्री. सोनवणे साहेब यांनी ग्रामपंचायत विल्होळी येथे भेट देऊन मुख्यमंत्री समृद्ध पंचायतराज अभियान अंतर्गत चालू असलेल्या कामकाजाबाबत व करावयाच्या कामाबाबत मार्गदर्शन व सूचना केल्या तसेच केलेल्या कामकाजाबद्दल माहिती घेतली व काही उपक्रमाची पाहणी केली ग्रामपंचायतने काल मा. गटविकास अधिकारी यांच्या उपस्थितीत खालील उपक्रम पूर्ण केले..



## नाविन्यपूर्ण उपक्रम

१) **जिल्हा परिषद शाळेतील विद्यार्थ्यांना चेस बोर्ड वाटप..**

विल्होळी येथील जिल्हा परिषद शाळेतील विद्यार्थ्यांना नाविन्यपूर्ण उपक्रमा अंतर्गत चेस बोर्डचे वाटप मा. ग.वि.अ.यांच्या उपस्थितीत करण्यात आले..

२) **एक झाड लेकीचे..**

एक झाड लेकीची उपक्रमांतर्गत आज विवाह झालेल्या वधूच्या वधू पिता व वधू माता यांना एक फळझाड ग्रामपंचायत मार्फत भेट देऊन मुलीची आठवण राहावी व मुलीचा जसा सांभाळ केला तसा सांभाळ व आठवण रहावी म्हणून एक फळझाड देऊन शुभेच्छा देण्यात आल्या...

३) **नाना नानी पार्क..**

नाविन्यपूर्ण उपक्रमांतर्गत विल्होळी येथील ग्रामपंचायत पाठीमागील गार्डनमध्ये नाना नानी साठी नाना नानी पार्क अंतर्गत बसण्यासाठी बेंच व विरंगुळा साहित्य बसविण्यात आले..

४) **अंत्यसंस्कारासाठी मोफत साहित्य..**

ग्रामपंचायत यांच्या मार्फत गावातील मयतांच्या  अंत्यसंस्कारासाठी लागणाऱ्या आवश्यक साहित्याचा खर्च यापुढे ग्रामपंचायत ने करण्याची ठरवले आणि चालू आर्थिक वर्षात मयत झालेल्या व्यक्तीच्या  अंत्यसंस्कारासाठी झालेला खर्च ग्रामपंचायत मार्फत करण्यात आला..

**५) ५% दिव्यांग खर्च**

ग्रामपंचायतला करायच्या ५%टक्के दिव्यांग खर्च अंतर्गत काल मा. गटविकास अधिकारी यांच्या उपस्थितीत ४ दिव्यांगांना प्रत्येकी १०,०००/रु.याप्रमाणे निर्वाह भत्ता चेक द्वारे वाटप करण्यात आला..

यावेळी मा.ग.वि.अ. यांनी ग्रामपंचायत मार्फत सुरू असलेल्या ,रेन वॉटर हार्वेस्टिंग शासकीय कार्यालयांना सोलर बसवणे इत्यादी कामाची पाहणी केली व वाचनालयातील विद्यार्थ्यांसोबत  संवाद साधून त्यांच्या अडचणी जाणून घेतल्या व आवश्यक मदत करण्याचे आश्वासन दिले यावेळी सरपंच श्रीमती जानकाबाई चव्हाण, ग्रामपंचायत सदस्य, स्थानिक कर्मचारी, अंगणवाडी सेविका, अशा, बचत गटांचे सदस्य, दिव्यांग बांधव व ग्रामस्थ उपस्थित होते..🙏👍

